दैनिक भास्कर समूहाचे वृत्तपत्र

# दिव्य मराठी

एकूण पाने : १२+८+४=२४ । किंमत ₹ ४.०० । वर्ष ९ । अंक २४९ । महानगर

divyamarathi.com | औरंगाबाद | गुरुवार, ६ फेब्रुवारी २०२० | १२ राज्ये | ६५ आवृत्त्या

**सुविचार**

एखादे काम कितीही कठीण असो, जिद्द आणि दृढनिश्चयाने ते पूर्ण केले जाऊ शकते.

| सेन्सेक्स | | सोने | |
|---|---|---|---|
| 41142 | +353.28 | 40,210 | -396 |
| **डॉलर (रु.)** | | **चांदी** | |
| 71.24 | + 0.0 | 45,510 | -500 |

**तापमान**

| | किमान | कमाल | आजचा अंदाज |
|---|---|---|---|
| औ.बाद | 16.0 | 29.6 | 30.0 |
| दिल्ली | 6.7 | 22.7 | 6.0 |
| मुंबई | 15.3 | 30.6 | 14.0 |
| सर्वात थंड | द्रास (लद्दाख) | | -12.0 |

'जिंका 21 कोटी' योजनेमध्ये प्री-रजिस्ट्रेशनचे
शेवटचे 5 दिवस
दिव्य मराठी जिंका 21 कोटी
QR कोड स्कॅन करा किंवा 9190000095 क्रमांकावर मिस्ड कॉल द्या व मिळालेल्या लिंकवर प्री-रजिस्ट्रेशन फॉर्म भरा.

## सिल्लोड तालुक्यातील अंधारीत रॉकेल टाकून पेटवून दिलेल्या महिलेचा मृत्यू

# ६८ तासांनंतर तिची झुंज संपली

**प्रतिनिधी** | औरंगाबाद/ पिंपळगाव पेठ

अंगावर रॉकेल टाकून पेटवून दिल्याने गंभीर जखमी झालेल्या अंधारी (ता. सिल्लोड) येथील महिलेचा (वय ५०) औरंगाबाद घाटी रुग्णालयात बुधवारी रात्री १० वाजता मृत्यू झाला. रविवारी रात्री बाराच्या सुमारास हा प्रकार घडल्यानंतर या महिलेस रात्री १.५१ वाजता घाटीत दाखल करण्यात आले होते. मात्र, ९५ टक्के भाजल्यामुळे तिचा मृत्यू झाला.



आरोपी संतोष

दरम्यान, आपल्या बहिणीने शरीरसुखासाठी नकार दिल्यावर संतोष सखाराम मोहिते याने जाळले, असा आरोप पीडितेच्या भावांनी केला. पोलिसांनुसार, आरोपीनेच तिला आपल्या गाडीतून रुग्णालयात दाखल केले. पीडितेच्या जबाबामुळे हा बनाव उघडकीस आला. आरोपी संतोष याचा गावातच बिअर बार आहे. त्याच्याकडे काम करणाऱ्या तरुणाशी पीडितेच्या मुलीचे लग्न झाले आहे. प्रचंड कमाई सुरू झाल्यानंतर आरोपी संतोष याने गावात दहशत निर्माण केली होती, अशी माहिती समोर येत आहे. आरोपी संतोष यास पोलिसांनी अटक केली असून त्याला न्यायालयाने १० फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

**काय घडले रविवारी रात्री? :** पोलिसांनुसार, रविवारी रात्री ११ नंतर संतोष पीडितेच्या घरी गेला. महिलेने विरोध केला तरी तो घरात शिरला आणि महिलेस मारहाण सुरू केली. नंतर त्याने घरातच पडलेली रॉकेलची कॅन तिच्या अंगावर उलटी केली आणि पेटवून दिले.

**ती ओरडत होती, दार बंद करून तो पळाला :** महिला आकांताने ओरडू लागताच त्याने घराचा दरवाजा बंद करून बाहेरून कडी लावली आणि निघून गेला. काही वेळाने पुन्हा आला. ती जिवंत होती. त्याने तिला घाटीत हलवले. सकाळपर्यंत आरोपी घाटीतच होता.

**माणुसकीचा हिंगणघात**

## पीडित तरुणीची प्रकृती चिंताजनकच, भाजलेल्या त्वचेमुळे जंतुसंसर्गाचा धोका

**नागपूर** | हिंगणघाट येथे सोमवारी विकी नगराळे या युवकाने अर्धवेळ प्राध्यापक असलेल्या तरुणीच्या अंगावर पेट्रोल टाकून पेटवले होते. यात तिच्या श्वसनसंस्थेला अतिशय गंभीर दुखापत झाली. तिची प्रकृती अजूनही चिंताजनक असून त्वचा जळाल्याने जंतूसंसर्गाचा धोका आहे. नागपुरात उपचारांच्या आधुनिक सुविधा असल्याने तिला मुंबईला हलवण्याची गरज नसल्याचे क्रिटिकल केअर तज्ज्ञ डॉक्टरांनी सांगितले.

**मुख्यमंत्र्यांकडून गंभीर दखल**

या घटनांची मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गंभीर दखल घेतली. कारवाईत हयगय करणारे पोलिस असो अथवा अधिकारी, कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा ठाकरे यांनी दिला.

## बलात्कारातील आरोपीला नातेवाइकांनी ठेचून मारले

### नगर जिल्ह्यातील घटना

**अकोले** | आदिवासी महिलेवर बलात्कार करणाऱ्या एका नराधमास या महिलेच्या नातेवाइकांनी बेदम मारहाण केल्याने त्याचा मृत्यू झाला. शिरपुंजे येथील ५५ वर्षांची महिला जनावरे चारण्यासाठी मंगळवारी गेली होती. राजू गणपत सोनवणे (४५, शिरपुंजे) याने तिच्यावर बलात्कार केला. नंतर तो जंगलात पळून गेला. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दरम्यान, पीडितेच्या नातेवाइकांनी आरोपी सोनवणे यास दुपारी शोधून काढत प्रचंड मारहाण केली. यातच तो मरण पावला.

## न्यूज ब्रीफ

### म्युच्युअल फंडाच्या लाभांशावर 10% टीडीएस

**नवी दिल्ली** | म्युच्युअल फंडाच्या लाभांशावर १० टक्के टीडीएस कापला जाईल. सीबीडीटीने बुधवारी हे स्पष्ट केले. युनिट होल्डर्सना वर्षभरात ५ हजारांहून अधिक लाभांश मिळाला असेल तरच हा टीडीएस कापला जाईल. पूर्वी ही तरतूद केवळ एनआरआयसाठी होती.

### सर्व सहकारी बँकांवर आरबीआयचे नियंत्रण

**नवी दिल्ली** | देशातील सर्व सहकारी बँकांवर आता रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे (आरबीआय) नियंत्रण असेल. केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी हा निर्णय घेतला. गेल्या काही वर्षांत जिल्हा बँकांतील अनेक घोटाळे उघडकीस आले होते.

### 347 धावा करूनही भारताचा अखेर पराभव

**हॅमिल्टन** | रॉस टेलरच्या नाबाद १०९ आणि हेनरी निकोल्स (७८) तसेच कर्णधार टॉम लाथम (६९) यांच्या कामगिरीमुळे न्यूझीलंडने पहिल्या एकदिवसीय सामन्यात ४८.१ षटकांत भारताचा चार गडी राखून पराभव केला. भारताने ४ बाद ३४७ धावा केल्या होत्या.

### 105 व्या वर्षी भागीरथी चौथीची परीक्षा उत्तीर्ण

**तिरुवनंतपुरम** | काही करण्याची जिद्द असेल तर वयाची मर्यादा नसतेच. १०५ वर्षांच्या भागीरथी अम्माने बुधवारी चौथी इयत्तेत ७४.५% गुण मिळवून हे सिद्ध केले. पर्यावरण, गणित व मल्याळम पेपर अम्माने ३ दिवसांतच पूर्ण केले.

**संसदेत मोदींची घोषणा** • दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या 3 दिवसांआधी पाऊल

# राममंदिर ट्रस्ट स्थापन; अयोध्येचे राजे, हिंदू पक्षाचे वकील परासरन विश्वस्त

- गृहमंत्री शहा म्हणाले, विश्वस्तांत दलित समुदायातील एका व्यक्तीचा समावेश
- नाव श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट व कार्यालय दिल्लीच्या ग्रेटर कैलाशमध्ये
- ट्रस्ट स्थापन करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने दिलेली मुदत ९ फेब्रुवारीपर्यंतच होती

**दिव्य मराठी नेटवर्क** | नवी दिल्ली/अयोध्या

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अयोध्येत राममंदिरासाठी ट्रस्ट स्थापनेची घोषणा बुधवारी केली. केंद्रीय मंत्रिमंडळाने ट्रस्ट स्थापनेस मंजुरी दिल्यानंतर मोदींनी लोकसभेत याची माहिती दिली. ट्रस्टचे नाव 'श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट' असे असून दिल्लीच्या ग्रेटर कैलाशमध्ये कार्यालय असेल. ट्रस्टच अयोध्येत राममंदिराची उभारणी व संबंधित निर्णय घेईल. विशेष म्हणजे, दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या मतदानास ३ दिवस उरले असताना ही घोषणा झाली. ट्रस्टच्या विश्वस्तांत अयोध्या वादात हिंदू पक्षाचे मुख्य वकील राहिलेले ९२ वर्षीय के. परासरन, एका शंकराचार्यांसह ५ सदस्य धर्मगुरू आहेत.



## अयोध्येतील राममंदिराबाबतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार ट्रस्टकडेच

### ट्रस्टमधील एक विश्वस्त दलित समुदायातील

पंतप्रधान मोदींनी अयोध्येत केंद्राने संपादित केलेली ६७ एकर जमीनही ट्रस्टला देणार असल्याचे सांगितले. या घोषणेच्या तासाभरातच गृहमंत्री अमित शहांनी ट्विट करून ट्रस्टचे नाव व विश्वस्तांची नावे जाहीर केली. ट्रस्टमध्ये एकूण १५ सदस्यांपैकी एक दलित समुदायातील असतील.

### वादग्रस्त २.५ एकरसह संपूर्ण जमीन रामलल्लाची

ट्रस्टला मंदिराबाबतचे निर्णय घेण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असेल. ६७.७०३ एकर जमीनही ट्रस्टला सोपवली जाईल. २.५ एकरजवळची ६७ एकर जमीन १९९३ मध्ये केंद्राने ताब्यात घेतली होती. सुप्रीम कोर्टाने ९ नोव्हेंबरला राममंदिर उभारणीसाठी ३ महिन्यांत ट्रस्ट स्थापण्याचे निर्देश दिले होते.

### अयोध्या जिल्हा मुख्यालयापासून सुमारे १८ किलोमीटर दूर मशिदीसाठी जागा




- सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार यूपी सरकारने सुन्नी वक्फ बोर्डाला ५ एकर जमीन दिली आहे. ती अयोध्या जिल्हा मुख्यालयापासून १८ किमीवर सोहावल तालुक्याच्या धन्नीपूर गावात आहे.
- यूपीचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या कॅबिनेट बैठकीत त्याला मंजुरी देण्यात आली.
- सरकारचे प्रवक्ते श्रीकांत शर्मा यांनी सांगितले की, राज्य सरकारने केंद्राला जमिनीसाठी तीन प्रस्ताव पाठवले होते. लखनऊ हायवेलगत असलेल्या या भूखंडापर्यंत जाण्यासाठी उत्तम वाहतूक व्यवस्था उपलब्ध आहे.

### केंद्रीय रिसीव्हरने ट्रस्टकडे सोपवली संपादित जमीन

केंद्र सरकारचे रिसीव्हर एम.बी. अग्रवाल यांनी १९९३ मध्ये संपादित करण्यात आलेल्या ६७ एकर जमिनीचा ताबा विश्वस्त विमलेंद्र प्रताप मिश्रा यांच्याकडे सोपवला. या ट्रस्टचे विश्वस्त मंडळ अध्यक्षांची निवड करेल.

### विश्वस्तांत महाराष्ट्राचे स्वामी गोविंददेव गिरी

विश्वस्तांत महाराष्ट्राच्या स्वामी गोविंददेव गिरी यांचाही समावेश आहे. ते रामायण, भगवद्‌गीता, महाभारत व इतर पौराणिक ग्रंथांचे प्रवचन करतात. गोविंददेव गिरी हे आध्यात्मिक गुरू पांडुरंगशास्त्री आठवले यांचे शिष्य आहेत.

## माघी एकादशीनिमित्त पंढरपुरात भाविकांची गर्दी



**पंढरपूर** | श्री विठ्ठलाच्या भक्तीपोटी लाखोंच्या संख्येने आलेल्या वैष्णवांनी बुधवारी माघी एकादशीच्या निमित्ताने येथे श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले. पहाटेपासूनच चंद्रभागेवर स्नानासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

# मराठा आरक्षणाला स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार

## प्रकरणाची अंतिम सुनावणी १७ मार्चपासून केली जाणार

**वृत्तसंस्था** | नवी दिल्ली

मराठा समाजाला महाराष्ट्रात देण्यात आलेल्या आरक्षणाला अंतरिम स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाने बुधवारी नकार दिला. यामुळे मराठा समाजाला मोठा दिलासा मिळाला आहे.

न्यायमूर्ती एल. नागेश्वर राव व न्या. दीपक गुप्ता यांच्या खंडपीठाने या आरक्षणास अंतरिम स्थगिती देण्यास नकार देताना याप्रकरणी अंतिम सुनावणी १७ मार्चपासून केली जाईल, असे स्पष्ट केले. त्यानंतर मात्र सुनावणीबाबत कोणतेही युक्तिवाद ऐकून घेतले जाणार नाहीत, असेही खंडपीठाने नमूद केले.

राज्य सरकारने शिक्षण आणि शासकीय नोकऱ्यांमध्ये मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. राज्य सरकारच्या या निर्णयाला मुंबई हायकोर्टात आव्हान देण्यात आले होते. मात्र, मुंबई हायकोर्टाने या संबंधातील याचिका फेटाळून लावली. याविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. इंदिरा साहनी प्रकरणी घटनापीठाने निश्चित केलेल्या आरक्षणावर ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन झाल्याचे या याचिकेत म्हटले आहे. दरम्यान, राज्य सरकारने मराठा आरक्षणासाठी सार्वजनिक बांधकाममंत्री अशोक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापली आहे.

ठेवींवर अधिक आकर्षक व्याजदर
7.75 %* p.a. ज्येष्ठ नागरिक
7.50 %* p.a. सर्वसाधारण/संस्था
१२ महिन्यांच्या पुढे ते १८ महिन्यांपर्यंत
दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. (मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
*अटी लागू
औरंगाबाद: २३४७५४४/२५५३१३२ २३८३००२/२४८४३९०/२३३०९६४

अभ्युदय को-ऑप. बँक लि. (मल्टी - स्टेट शेड्युल्ड बँक)
— आपली बँक —
आकर्षक मुदत ठेव योजना
शुभंकरोती - II
18 महिन्यांकरिता व्याजदर
8.25% (प्रति वर्ष) ज्येष्ठ नागरिकांसाठी
8.10% (प्रति वर्ष) इतरांसाठी
योजनेचा कालावधी: 29 फेब्रुवारी, 2020 पर्यंत
संपर्क:1800-22-9699
www.abhyudayabank.co.in

## निर्भयाच्या चारही दोषींना एकाच वेळी फाशी; हायकोर्टाचे निर्देश

### दिल्ली हायकोर्टाची आरोपींना ७ दिवसांची मुदत

**दिव्य मराठी नेटवर्क** | नवी दिल्ली

निर्भयाच्या चारही दोषींना वेगवेगळी फाशी दिली जाऊ शकत नाही, सर्वांना एकाच वेळी फासावर लटकावले जाईल, असे दिल्ली हायकोर्टाने स्पष्ट केले. दोषींच्या डेथ वॉरंटवर स्थगितीशी संबंधित सत्र न्यायालयाच्या निकालाविरुद्ध केंद्र सरकारची याचिकाही हायकोर्टाने फेटाळली. यानंतर काही तासांतच केंद्र व दिल्ली सरकारने त्याला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. चारही आरोपींनी ७ दिवसांत आपले सर्व कायदेशीर पर्याय वापरून संपवावेत, असे निर्देश न्या. सुरेशकुमार कैत यांनी दिले. यानंतर डेथ वॉरंट जारी करण्याची प्रक्रिया सुरू होईल. मुकेश सर्व पर्याय वापरून पाहत आहे म्हणून त्याला इतरांच्या आधी फाशी देता येणार नाही, असेही न्या. कैत म्हणाले.

**अक्षयचा दयेचा अर्ज फेटाळला :** राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी बुधवारी दोषी अक्षयचा दयेचा अर्ज फेटाळला. यापूर्वी मुकेश व विनय यांचेही अर्ज फेटाळण्यात आले आहेत. आता फक्त पवन गुप्ताजवळच क्युरेटिव्ह याचिका व दयेच्या अर्जाचा पर्याय उरला आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष विनायक मेटेंचा राजीनामा

**मुंबई** | शिवसंग्राम संघटनेचे अध्यक्ष व माजी आमदार विनायक मेटे यांनी बुधवारी मुंबईच्या अरबी समुद्रात बांधण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प अंमलबजावणी, देखरेख व समन्वय समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे.



सामान्य प्रशासन विभागात मेटेंची नियुक्ती रद्द करण्याच्या हालचाली चालू होत्या. याबाबत जीआर काढला जाणार होता. हे स्मारक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली उभारण्यात येत आहे. त्यामुळे यापुढे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांच्या हाती या स्मारकाचे भवितव्य असेल.

## न्या. चपळगावकर, भापकर, दळवी यांना वाङ्मय पुरस्कार

### यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०१८







**मुंबई** | राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांची (२०१८) घोषणा बुधवारी करण्यात आली.

पुरस्कार मिळवणाऱ्या मान्यवरांत औरंगाबादचे निवृत्त न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर, माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, सोलापूरचे साहित्यिक द. ता. भोसले, नागपूरच्या कवयित्री प्रभा गणोरकर, कोल्हापूरच्या अनुवादक मेधा पानसरे आणि मुंबईचे नाटककार अजित दळवी, विलास सिंदगीकर आदींचा समावेश आहे. या पुरस्कारात विविध वाङ्मय प्रकारातील ३५ साहित्यकृतींचा समावेश आहे. पुरस्काराची रक्कम १ लाख ते ५० हजार आहे.

पुरस्कार विजेत्यांची यादी. पान १२

www.vectus.in
VECTUS PIPES AND TANKS
VECTUS with MICROBAN
Pioneer in World of Antibacterial Technology
ज्या रोखतात 99.9% पर्यंत जिवाणूना आणि करतात तुमच्या परिवाराच्या आरोग्याचे पूर्ण संरक्षण




10,000 लिटरपर्यंत उपलब्ध | चार पदरी दमदार टाक्या | मजबूत गोलाकार झाकण
WATER STORAGE TANKS I PVC PIPING I PPR PIPING
CPVC PIPING I SWR DRAINAGE PIPING I COMPOSITE PIPING
COLUMN/CASING & HDPE PIPING
अधिकृत विक्रेता: • औरंगाबाद : महेंद्र ट्रेडिंग कं.: 75885 38999, 93703 80999
डिस्ट्रिब्युटरशिप/डीलरशिपसाठी कॉल करा: 98814 94478, टोल फ्री नंबर: 1800-120-12345

**दिव्य मराठी विशेष** • शाहीन बागेत 30 रोजी झालेल्या ४ महिन्यांच्या बालकाच्या मृत्यूने दु:खी होऊन लिहिले पत्र

# शाहीन बाग : निदर्शनांत लहान मुलांना सहभागी करून घेणे हे क्रौर्यच; 10 वर्षांच्या मुलीने सुप्रीम कोर्टाला लिहिले पत्र

### धरणे, निदर्शने अशा आंदोलनांत मुलांना सहभागी करू नये याबद्दल कठोर निर्देश देण्याची मागणी

**वृत्तसंस्था** | मुंबई

दिल्लीच्या शाहीन बागेत नागरिकत्व दुरुस्ती कायद्याच्या विरोधात सुरू असलेले धरणे व निदर्शनांत एका नवजाताचा मृत्यू झाला. यावरून १० वर्षांच्या झेन गुणरत्न सदावर्तेने सर्वोच्च न्यायालयास पत्र लिहिले आहे. आग लागलेली असताना १७ लोकांचे प्राण वाचवल्याबद्दल झेनचा शौर्य पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे. तिने शाहीन बागेत ४ महिन्यांच्या मुलाचा मृत्यू झाल्याने आपण दु:खी आहोत असे म्हटले. सरन्यायाधीश एस. ए. बोबडे यांना लिहिलेल्या ५ पानी पत्रात ती म्हणते, या घटनेमुळे एक नागरिक म्हणून मला मोठा मानसिक धक्का बसला आहे. कलम २१ नुसार चार महिन्यांच्या मुलाच्या जगण्याचा अधिकार हिरावून घेतला आहे. तो आईसोबत दररोज निदर्शनांत जात होता. या पत्राला याचिकाही मानले जाऊ शकते. मुले व नवजातांच्या आरोग्यास धोका असताना, त्यांना निदर्शनांत सहभागी करण्यापासून रोखण्यासाठी पोलिस अपयशी ठरले. पोलिसांनी या मुलाच्या मृत्यूच्या कारणांची चौकशी करावी. तिने मृत मुलाचे पिता आरिफ व आई नाझिया तसेच दिल्ली पोलिस व शाहीन बाग आंदोलनाचे संयोजक यांनी कथितदृष्ट्या निष्काळजीपणा दाखवल्याबद्दल दोषी ठरवण्याची मागणीही केली आहे. झेनच्या आई-वडिलांनी सांगितले, जेनचा शाहीन बाग आंदोलनास विरोध नाही. परंतु त्या मुलांच्या दु:खाची तिने जाणीव करून दिली आहे. कारण त्यांना आपले दु:ख मांडता येत नाही. हा प्रकार यातना व क्रौर्याचा आहे.

### १७ जणांना आगीतून वाचवल्याबद्दल मिळाले अवॉर्ड



**१० वर्षांची झेन मुंबईत राहते व डॉन बॉस्को इंटरनॅशनल स्कूल, माटुंगा येथे सातव्या इयत्तेत शिकते. तिला राष्ट्रपतींच्या हस्ते या वर्षी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. झेनने मुंबईतील क्रिस्टल टॉवरला आग लागल्यानंतर १७ लोकांचे प्राण वाचवले होते. झेनच्या शाळेत मुलांना जाळपोळ, भूकंप व इतर नैसर्गिक आपत्तीशी लढा देण्याची प्रात्यक्षिके शिकवली जातात. यासाठी तिला शौर्य पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.**